**विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या संप कालावधीतील (दि.१४-७-२००९ ते २६-८-२००९ पर्यंत) वेतन वितरीत करण्याबाबत उपाययोजना.....**

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २००९/२००९/(३५९/०९)-वि शि-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ३१ ऑगस्ट , २००९.

वाचा :- १) शासन निर्णय क्र.एनजीसी-२००९/(२४३/०९)/विशि-१, दि.१२ ऑगस्ट २००९
२) [illegible]

## परिपत्रक

Maharashtra Federation of University & College Teacher's Organization (MFUCTO) या संघटनेने विविध मागण्यांच्या अनुषंगाने दिनांक १४ जुलै, २००९ पासून दि.२६ऑगस्ट,२००९ पर्यंत संप सुरु ठेवला होता. सदर संघटनेच्या मागण्यांसंदर्भात मा. मख्यमंत्री, मा. मंत्री (उ. व तं.शि.) तसेच मा.मंत्री (वित्त) यांच्या समवेत अनेक बैठका (प्रामुख्याने दि.१५, १६, १८, २९ व ३० जुलै तसेच दि.३,२०, २५ व २६ ऑगस्ट, २००९ रोजी) झाल्या. मा. मंत्री (उ. व तं.शि.) व मा. मुख्य सचिव यांच्यासमवेत सदर संघटनेची शेवटची बैठक दिनांक २६-८-२००९ रोजी झाली. सदर सर्व बैठकीतील चर्चेमध्ये एमफुक्टो या संघटनेच्या अध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांनी असे अधिकृतरित्या सांगीतले की, राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठातील व सर्व अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील १००% शिक्षक दिनांक १४ ७ २००९ पासून २५-८-२००९ पर्यंत संपावर आहेत. दिनांक २६.८.२००९ रोजी बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार दि.२७.८.२००९ पासून संप मागे घेण्यात आलेला आहे.

सदर बैठकीमध्ये शिक्षकांच्या संप कालावधीतील पगाराबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले :-

" शिक्षकांच्या संप कालावधीतील पगार त्यांना तूर्त अदा करण्यात येऊ नये. तथापि, संपाच्या कालावधीत विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान शिक्षकांना अनुज्ञेय असलेल्या Vacation Leave च्या कालावधीत अधिकचे तास घेऊन भरुन काढावे व विहित अभ्यासक्रम पूर्ण करावा. संबंधित शिक्षकांनी संपाचे पूर्ण दिवस भरुन काढले आहेत किंवा कसे, याबाबत संबंधित विद्यापीठाने खात्री करुन तशाप्रकारचे प्रमाणपत्र संबंधीत विभागीय सह संचालक (उ.शि.) यांच्याकडे सादर करावे. विद्यापीठाने असे प्रमाणपत्र संबंधित सह संचालकांना सादर केल्यावर या संप कालावधीचा पगार देण्याची कार्यवाही करावी. "

वरील निर्णयाच्या अनुषंगाने दि.२९ ऑगस्ट, २००९ च्या परिपत्रकान्वये खालीलप्रमाणे सूचना देण्यात आलेल्या हेत :-

३.१. सर्व अकृषि विद्यापीठे व अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सर्व शिक्षकांचा दि.१४.७.२००९ दि.२६-८-२००९ पर्यंतच्या कालावधीतील (एकूण ४४ दिवस) पगार तूर्त देण्यात येवू नये.

३.२. संप कालावधीतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान भरुन काढण्यासाठी वरील परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विद्यापीठ व महाविद्यालयाने योग्य ती कार्यवाही त्वरीत सुरु करावी. याबाबतचे सविस्तर आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

३.३. परिच्छेद ३.१ व ३.२ मध्ये नमद केल्याप्रमाणे विद्यापीठ स्तरावरुन आवश्यक ती कार्यवाही करण्याची सर्व जबाबदारी कुलगुरु, संचालक व सह संचालक (उ. शिक्षण) यांची राहील.

## आदेश

४. उक्त परिच्छेद ३.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे संप कालावधीतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान भरुन काढण्याबाबतचे सविस्तर आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासन पुढील प्रमाणे आदेश देत आहे. :-

४.१ परिच्छेद १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे एमफुक्टो या संघटनेच्या अध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठातील व सर्व अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील १००% शिक्षक दिनांक १४-७-२००९ पासून २६-८-२००९ पर्यंत संपावर होते असे गृहीत धरण्यात येत आहे.

४.२ <u>विहित अभ्यासक्रम योग्य रितीने पूर्ण करणे :-</u>

(i) संप कालावधीतील झालेले शैक्षणिक नुकसान भरुन काढण्याबाबत विद्यापीठाचे कुलगुरु यांनी सर्व संबंधीतांशी (उदा.प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी, विभागीय सह संचालक, इत्यादी) चर्चा करुन सविस्तर व योग्य अशी योजना /वेळापत्रक तयार करावे.

(ii) वरील योजना / वेळापत्रक तयार करतांना कुलगुरु यांनी विद्यार्थ्यांचे हित व सर्वांच्या (म्हणजे विद्यार्थी , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी इत्यादी) सोयी लक्षात घ्याव्यात.

(iii) या योजना / वेळापत्रक कुलगुरु यांनी त्वरीत जाहीर करुन ते इंटरनेटवर उपलब्ध करुन द्यावे व त्याची एक प्रत संबंधित सह संचालक यांच्याकडे माहितीसाठी पाठवावी.

(iv) संपाच्या कालावधीत विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान शिक्षकांना अनुज्ञेय असलेल्या Vacation Leave च्या कालावधीत प्रत्येक शिक्षकाने अधिकचे तास घेऊन भरुन

काढण्याचे एम्फुक्टो या संघटनेने सुचविल्याची बाब मान्य केल्यामुळे कुलगुरु यांनी वरीलप्रमाणे आखलेल्या योजनेच्या / वेळापत्रकाच्या अनुषंगाने सर्व शिक्षकांना अधिकचे तास घेऊन विहीत अभ्यासक्रम योग्य रितीने पूर्ण करणे आवश्यक राहील.

४.३ <u>शिक्षकांनी विहीत अभ्यासक्रम योग्य रितीने पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र विद्यापीठाचे कुलगुरु यांनी सादर करणे :-</u>

(i) शिक्षकांनी संपाचे पूर्ण दिवस भरुन विहीत अभ्यासक्रम योग्य रितीने पूर्ण केला किंवा नाही याबाबत संबंधित विद्यापीठाने खात्री करावी व कुलगुरु यांनी स्वत: किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांनी तसे प्रमाणीत करावे.

(ii) अनुदानीत अशासकीय महाविद्यालयांच्या बाबतीत संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या प्रमाणपत्राच्या आधारावर विद्यापीठाने खात्री करावी व त्याच्या आधारावर प्रमाणपत्र द्यावे. मात्र, विद्यापीठातील शिक्षकांबाबत विद्यापीठाने स्वत: खात्री करुन तसे प्रमाणपत्र द्यावे.

(iii) वरील बाबी प्रमाणित करतांना विद्यापीठाने व संबंधीत महाविद्यालयाने विद्यार्थी व पालक यांच्याकडून सुध्दा योग्य तो feedback घ्यावा.

(iv) वरीलप्रमाणे देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रात कुलगुरु यांनी संबंधित शिक्षकांना संप कालावधीतील पगार देण्यात यावा किंवा नाही अशी स्पष्ट व निःसंदिग्ध शिफारस करावी.

(v) विद्यापीठाच्या कुलगुरुंनी वरीलप्रमाणे आवश्यक ते प्रमाणपत्र संबंधित विभागीय सह संचालकांकडे विनाविलंब सादर करावे.

४.४ <u>संप कालावधीतील वेतन वितरीत करणे :-</u>

(i) वरीलप्रमाणे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर विभागीय सह संचालकांनी वेतन वितरीत करण्यासाठीचा आवश्यक तो प्रस्ताव संचालक (उच्च शिक्षण) यांच्यामार्फत विनाविलंब शासनास सादर करावा.

(ii) संचालक, उच्च शिक्षण यांच्याकडून वरील प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर शासन स्तरावर निर्णय घेऊन निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येईल.

(iii) ज्या शिक्षकांच्या बाबतीत वरील स्वरुपाचे प्रमाणपत्र विद्यापीठाकडून प्राप्त होणार नाही त्या शिक्षकांना संप कालावधीतील वेतन मंजूर करण्यात येणार नाही.

४.५ <u>विहित अभ्यासक्रम पूर्ण केल्यासंदर्भात चुकीचे प्रमाणपत्र सादर केल्यास शास्ती :-</u>

(i) विद्यापीठातील शिक्षकांनी विहित अभ्यासक्रम पूर्ण केल्याबाबत विद्यापीठाच्या कुलगुरुंनी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांनी सादर केलेले प्रमाणात्र खोटे असल्याचे सिध्द झाल्यास,

संबंधितांविरुद्ध आवश्यक ती कारवाई करण्यात येईल. तसेच सदर माहितीच्या आधारे जेवढे वेतन द्यावे लागलेले आहे त्या संपूर्ण रक्कमेएवढी रक्कम दंड स्वरुपात संबंधीत विद्यापीठ, कुलगुरु व संबंधित विद्यापीठीय अधिकाऱ्याकडून वसूल करण्यात येईल.

(ii) महाविद्यालयातील शिक्षकांनी विहित अभ्यासक्रम पूर्ण केल्याबाबत महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सादर केलेले प्रमाणपत्र खोटे असल्याचे सिध्द झाल्यास, संबंधितांविरुद्ध आवश्यक ती कारवाई करण्यात येईल. तसेच सदर माहितीच्या आधारे जेवढे वेतन द्यावे लागलेले आहे त्या संपूर्ण रक्कमेएवढी रक्कम दंड स्वरुपात संबंधीत महाविद्यालय, प्राचार्य व संबंधित महाविद्यालयीन अधिकाऱ्यांकडून वसूल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(रा. गो. जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
मा. मंत्री (उ. व तं.शि.), यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री (उ. व तं.शि.), यांचे खाजगी सचिव,
सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलगुरु,
सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभाग,
सर्व सह सचिव/उप सचिव (उ. व तं.शि.), मंत्रालय, मुंबई,
निवड नस्ती (विशि-१)